# तहसिल कार्यालय पारनेर

**विषय** :- महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना- महाराष्ट्र अंतर्गत प्रशासकिय मान्यता आदेश

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत सन- २०२४-२५ च्या पुरवणी आराखडयात मंजूर असलेल्या रस्त्याच्या कामांना प्रशासकिय मंजुरीबाबत.

**संदर्भ** :- १. शासन निर्णय क्र.मग्रारोहयो-२०१०,प्र.क्र.-४७ /रोहयो- १० दि. ०८ जुन, २०१०

२.नियोजन विभाग यांचेकडील शासन निर्णय क्र.मग्रारोहयो - २०२२ प्र.क्र.- १७८/रोहयो-६अ,दि. ७ नोव्हेंबर,२०२२.

३.नियोजन विभाग यांचेकडील शासन निर्णय क्र.मग्रारोहयो-२०२२ प्र.क्र.-४७/रोहयो-१०,दि. १३ एप्रिल २०२३

४. मा.उपजिल्हाधिकारी रोहयो,अहमदनगर यांचे कार्यालयाकडील पत्र क्र.रोहयो/कार्या.१८/१८/७७४/२०२३,दि.२७/०४/२०२३.

५.उपविभागीय अभियंता,सार्वजनिक बांधकाम उपविभाग पारनेर यांचे कार्यालयाकडील पत्र जा.क्र/२७३/२०२४ दि.०२/१०/२०२४

क्र.कावि/रोहयो/३४१/२०२४ **आदेश** दि.०७/१०/२०२४

**ज्याअर्थि**, उपविभागिय अभियंता सार्वजनिक बांधकाम उपविभाग पारनेर यांनी दि.०२/१०/२०२४ रोजीच्या पत्रान्वये खालील नमुद प्रस्तावांना सदर शासन निर्णयान्वये प्रशासाकिय मान्यता मिळणेबाबत प्रस्ताव दाखल केलेले आहेत.

| अ.क्र | कामाचे नाव | यादी क्रमांक | अंदाजित रक्कम रूपये |
|---|---|---|---|
| १. | संतोष गागरे ते भास्कर गागरे रस्ता खडीकरण करणे. | ग्रामसभा ठराव क्र. दि.३०/०९/२०२४ पळशी ता.पारनेर | २४८५९०१/- |
| २. | संकलेश मोढवे ते संतोष गागरे रस्ता खडीकरण करणे. | ग्रामसभा ठराव क्र. दि.३०/०९/२०२४ पळशी ता.पारनेर | २४९३४१०/- |
| ३. | भाऊसाहेब बिलबिले ते आश्रम शाळा रस्ता खडीकरण करणे. | ग्रामसभा ठराव क्र. दि.३०/०९/२०२४ पळशी ता.पारनेर | २४७५५९८/- |

**ज्याअर्थि**, मा. उपजिल्हाधिकारी रोहयो, अहमदनगर यांनी दि.२७/०८/२०२३ चे पत्रान्वये शासन निर्णय, दि. १३ एप्रिल २०२३ बाबत खुलासा करण्यात येउन तहसिल स्तरावर प्राप्त असलेल्या अधिकारानुसार रू.२५.०० लक्षचे मर्यादेतील कामांना प्रशासकिय व तांत्रिक मान्यता देण्याची कार्यवाही करणेबाबत नमुद केलेले आहे.

**त्याअर्थि** मी तहसिलदार, पारनेर मा.उपजिल्हाधिकारी रोहयो, अहमदनगर यांचेकडील उक्त नमुद मार्गदर्शन पत्र आणि शासन निर्णयानुसार प्राप्त झालेल्या अधिकराचा वापर करून उक्त नमुद प्रस्तावांना खालील नमुद अटी व शर्तीच्या अधिन राहून प्रशासकिय मान्यता देण्यात येत आहे.

**यंत्रणेचे नाव - जि.प.सा.बां. उपविभाग पं.स.पारनेर.**

| अ. क्र | कामाचे नाव | गावाचे नाव | तांत्रिक मान्यता क्र.व दिनांक | अकुशल | कुशल | एकुण | प्रशासकिय मान्यता दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | संतोष गागरे ते भास्कर गागरे रस्ता खडीकरण करणे. | पळशी | जा.क्र.१८०/२०२४ दि.०२.१०.२०२४ | ३०५८६५/- | १८३१९६३/- | २१८००३६/- | जा.क्र.१७०/२०२४ दिनांक ०७/१०/२०२४ |
| २. | संकलेश मोढवे ते संतोष गागरे रस्ता खडीकरण करणे. | पळशी | जा.क्र.१८१/२०२४ दि.०२.१०.२०२४ | ३०५१२६/- | १८३८८९४/- | २१८८२८४/- | जा.क्र.१७१/२०२४ दिनांक ०७/१०/२०२४ |
| ३. | भाऊसाहेब बिलबिले ते आश्रम शाळा रस्ता खडीकरण करणे. | पळशी | जा.क्र.१८२/२०२४ दि.०२.१०.२०२४ | ३१२०५८/- | १८१८१०१/- | २१६३५४०/- | जा.क्र.१७२/२०२४ दिनांक ०७/१०/२०२४ |

अटी व शर्ति -

१. काम सुरू करण्यापुर्वी कामाचा अंदाजपत्रकिय खर्च, निर्माण होणारे मनुष्य दिन,कामापासुन होणारे फायदे इ. माहिती स्थानिक दक्षता व सनियंत्रित समितीस देण्यात यावी.

२. कामावरील मजुरांच्या मजुरीचे वाटप केल्यानंतर त्यांची नोंद मजुरांचे रोजगार पत्रकावर घेणे बंधानकारक असून मजुरीचे वाटप झालेनंतर हजेरी पत्रकाची साक्षांकित प्रत ग्रामपंचायतीला त्वरीत उपलब्द करूण देण्यात यावी आणि सदर हजेरी पत्रकाची मुळ पत्र आपल्या कार्यालयाच्या अभिलेखावर ठेवावी.

३. हजेरी पत्रक ग्रामपंचायतला जमा झालेनंतर ग्रामपंचायतीने नोंदवही नमुना ९ मध्ये कामावर उपस्तीत मजुरांची नावे आणि त्यांना पडलेली मजुरी या बाबत नोंद घेणे आवश्यक असुन नोंदवही नमुना १५ मध्ये कामावर वापरलेले हजेरी पत्रके प्राप्त झालेची नोंद घ्यावयाची आहे.

४. ग्रामसभेस सामाजिक लेखा परीक्षणासाठी कामावर झालेल्या खर्चाची संपुर्ण माहिती उपलब्द करूण देण्यात यावी.

५. सदरचे काम या योजने अंतर्गत नोंदणी झालेल्या मजुरांकडूनच करूण घेण्यात यावी.

६. या कामाचा अकुशल/कुशल भागाचा खर्च अंदाज पत्रकिय तरतुदीच्या आत करणेत यावा.

७. कामावरील मजुरांना देणेत येणाऱ्या सोयी सवलती रोहयो अंतर्गत नियमानुसार देण्यात याव्यात.

८. मजुरांना मजुरीचे वाटप हे त्यांनी केलेल्या कामाच्या प्रमाणात आणि शासनाचे दर पत्रकाप्रमाणे करावी.

९. कार्यान्वयीन यंत्रणेचे कामनिहाय नोंदवही ठेवावी व कामाच्या प्रगती अहवालानुसार अकुशल/कुशल खर्चाच्या नोंदी अद्दयावत ठेवाव्यात.

१०. कामाचा मासिक प्रगती अहवाल व मासिक खर्चाचा अहवाल पुढील महिन्याचे ५ तारखेच्या आत या कार्यालयास सादर करावा.

११. प्रत्येक कामासाठी स्वतंत्र हजेरी पट ठेवण्यात यावा व त्यामध्ये कुटूंबाचा रोजगार पत्रक क्रं./जातिचा प्रवर्ग अ.जा./अ.ज/इतर या नोंदी घेण्यात याव्यात.

१२. सदरचे काम सुरू करण्यापूर्वी ते इतर योजनेमधून मजूर किंवा सुरू झाले नाही याची खात्री करूनच काम सुरू करावे.

१३. काम पुर्ण झालेनंतर संबंधित पंचायत/ ग्रामपंचायतीस हस्तांतर करण्यात यावे. कार्यन्वयीन यंत्रणेचे केंद्र शासन व राज्य शासन यांनी दिलेल्या सुचनांचे तंतोतंत पालन करावे.

१४. महाराष्ट्र रोजगार हमी योजना वार्षिक नियोजन आराखडा सन २०२३-२४ मध्ये वरील कामांचा समावेश नसेल तर सदर कामांचा वार्षिक नियोजन आराखडा सन २०२४-२५ च्या

पुरवणी आराखडयात समावेश करावा.

१५. काम पुर्णत्वाचे दाखले नोंदविणे कामी तीन फोटो या कार्यालयास सादर करावे.

१.काम सुरू होणेपुर्वी २.काम सुरू असताना ३.काम पुर्ण झालेनंतर.

१६. मस्टर ट्रॅकर शीट प्रमाणे हजेरीपत्रक अदागीसाठी सादर करावे.

१७. सदरील कामाचा कुशल खर्च संबंधित आर्थिक वर्षातच करणेत यावा.

**सदर आदेशाची तातडीने अंमलबजावणी करावी.**

(गायत्री सौंदणे)

तहसिलदार तथा

गटकार्यक्रम अधिकारी मग्रारोहयो पारनेर

प्रत,- उपअभियंता (जि.प.सा.बां.) उपविभाग पं.स.पारनेर

प्रत माहितीसाठी,

१. मा.उपजिल्हाधिकारी रोहयो,अहमदनगर
२. मा.उपविभागीय अधिकारी श्रीगोंदा - पारनेर उपविभाग अहमदनगर

विषय:- महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना अंतर्गत कामे सुरू करणे बाबत...

संदर्भ :- या कार्यालयाची प्रशासकिय मान्यता जा.क्र.मग्रारोहयो. ३४१/२०२४ दि.०७/१०/२०२४

## कार्यारंभ आदेश

जा.क्र.कावि/रोहयो/ ३४२/२०२४ दिनांक :-०७/१०/२०२४

या कार्यालयाकडील प्रशासकिय मान्यता आदेशानुसार तहसिलदार तथा गटकार्यक्रम अधिकारी मग्रारोहयो पारनेर यांना देण्यात अधिकाराचा वापर करून महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत अंबलबजावणी खालील कामांना कार्यरंभ आदेश देत आहे.

| अ.क्र | ग्रामपंचायत | कामाचा प्रकार | प्रशासकिय मान्यता | प्रशासकिय मान्यता रक्कम | कार्यान्वित यंत्रणा |
|---|---|---|---|---|---|
| १. | पळशी | संतोष गागरे ते भास्कर गागरे रस्ता खडीकरण करणे. | जा.क्र.रोहयो १७०/२०२४ दि.०७/१०/२०२४ | २१८००३६/- | जि.प.सां.बां. उपविभाग पं.स.पारनेर |
| २. | पळशी | संकलेश मोढवे ते संतोष गागरे रस्ता खडीकरण करणे. | जा.क्र.रोहयो १७१/२०२४ दि.०७/१०/२०२४ | २१८८२८४/- | जि.प.सां.बां. उपविभाग पं.स.पारनेर |
| ३. | पळशी | भाऊसाहेब बिलबिले ते आश्रम शाळा रस्ता खडीकरण करणे. | जा.क्र.रोहयो १७२/२०२४ दि.०७/१०/२०२४ | २१६३५४०/- | जि.प.सां.बां. उपविभाग पं.स.पारनेर |

तहसिलदार पारनेर

तहसिलदार तथा

**गटकार्यक्रम अधिकारी मग्रारोहयो पारनेर**

या कार्यालयीन पारीत केलेल्या आदेशाच्या अटींचे पालन करण्यात यावे. व साप्ताहिक अहवाल विहित नमुन्यात या कार्यालयास सादर करावा. शासनाकडील वेळोवेळी पारित स्थायी आदेशांचे उल्लंघन होणार नाही याची दक्षता कार्यान्वित यंत्रणांनी घ्यावी.

प्रत:- मा. उपजिल्हाधिकारी रोहयो अहमदनगर यांना माहितीस्तव सविनय सादर.

प्रत:- मा.उपविभागीय अधिकारी श्रीगोंदा- पारनेर उपविभाग अहमदनगर यांना माहितीस्तव सादर.

प्रत :- उपभियंता जि.प.सां.बां. उपविभाग पं.स.पारनेर.